**मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा. लि., सर्वे नं. १५५, गाव- अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये उत्पादनांच्या क्षमतेचा विस्तार आणि एपीआय, एपीआय/केमिकल इंटरमिजिएटस- ७०० टीपीएम (ग्वानीन-८० टीपीएम, असिक्लोविर-३० टीपीएम, एन-२-अमिनो-४, डिक्लोरो-५-पायरिमिडीनिल-फॉर्ममाइड (FADCP) -२० टीपीएम, ग्वानिडाइन कार्बोनेट-३० टीपीएम, ग्वानिडाइन हायड्रोक्लोराइड-२० टीपीएम, डॉडेसिल गुआनिडीन एसिटेट क्रूड ९५%-२० टीपीएम आणि कोव्हिड एपीआय- १३ टीपीएम (फेविपिरावीर-५ टीपीएम, डेक्सामेथासोन-३ टीपीएम, मोलनुपिरावीर-५ टीपीएम) व उपउत्पादन- ८७.४० टीपीएम (मेथॅनॉल-६२.२० टीपीएम, फोरमिक एसीड-२५.२० टीपीएम) उत्पादन करणे बाबत दिनांक २९/०८/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा. लि., सर्वे नं. १५५, गाव- अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा. लि., सर्वे नं. १५५, गाव- अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये उत्पादनांच्या क्षमतेचा विस्तार आणि एपीआय, एपीआय/केमिकल इंटरमिजिएटस- ७०० टीपीएम (ग्वानीन-८० टीपीएम, असिक्लोविर-३० टीपीएम, एन-२-अमिनो-४,डिक्लोरो-५-पायरिमिडीनिल-फॉर्ममाइड(FADCP)-२० टीपीएम, ग्वानिडाइन कार्बोनेट-३० टीपीएम, ग्वानिडाइन हायड्रोक्लोराइड-२० टीपीएम, डॉडेसिल गुआनिडीन एसिटेट क्रूड ९५%-२० टीपीएम) आणि कोव्हिड एपीआय- १३ टीपीएम (फेविपिरावीर-५ टीपीएम, डेक्सामेथासोन-३ टीपीएम, मोलनुपिरावीर-५ टीपीएम) व उपउत्पादन- ८७.४० टीपीएम (मेथॅनॉल-६२.२० टीपीएम, फोरमिक एसीड-२५.२० टीपीएम) उत्पादन करणे बाबत दिनांक २९/०८/२०२३ रोजी दूपारी १२:०० वाजता मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा. लि., सर्वे नं. १५५, गाव- अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५२/ २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०७२८- एफटीएस-०००५ दि. २८/०७/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. शिवकुमार स्वामी,**<br>अव्वर जिल्हादंडाधिकारी, बीड. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. सुजित ढोलम,**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | : | सदस्य |
| ३. | **श्री. सो. म. कुरमुडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा. लि., सर्वे नं. १५५, गाव- अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये उत्पादनांच्या क्षमतेचा विस्तार आणि एपीआय, एपीआय/केमिकल इंटरमिजिएटस- ७०० टीपीएम (ग्वानीन-८० टीपीएम, असिक्लोविर-३० टीपीएम, एन-२-अमिनो-४, डिक्लोरो-५-पायरिमिडीनिल-फॉर्ममाइड(FADCP)-२० टीपीएम, ग्वानिडाइन कार्बोनेट-३० टीपीएम, ग्वानिडाइन हायड्रोक्लोराइड-२० टीपीएम, डॉडेसिल गुआनिडीन एसिटेट क्रूड ९५%-२० टीपीएम) आणि कोव्हिड एपीआय- १३ टीपीएम (फेविपिरावीर-५ टीपीएम, डेक्सामेथासोन-३ टीपीएम, मोलनुपिरावीर-५ टीपीएम) व उपउत्पादन- ८७.४० टीपीएम (मेथॅनॉल-६२.२० टीपीएम, फोरमिक एसीड-२५.२० टीपीएम) उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. कॅनपेक्स केमिकल्स प्रा.लि. यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. ०७/०७/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी दिं. २९/०८/२०२३ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. २५/०७/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता खालील ठिकाणी ठेवण्यात आलेल्या होत्या.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, आष्टी.
५. ग्रामपंचायत कार्यालय, अंभोरा, चोबेवाडी, नांदूर, सालेवडगाव, चिचोडी, ता.आष्टी, जि. बीड.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे २ सूचना इमेलद्वारे प्राप्त झाल्या त्याची नोंद घेण्यात आली आहे व सोबत जोडण्यात येत आहे. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. त्यानंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

श्री. अजिंक्य नाकोड, प्रकल्प सल्लागार, मे. ॲनाकॉन लेबोरेटरीज प्रा.लि., नागपूर यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे यांनी सांगितले की, सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्पा व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तार/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| **अ.क्रं.** | **केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव.** | **उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर.** |
|---|---|---|
| १. | श्री. अतूल विठठल खकाळ, रा. अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड यांनी सर्वप्रथम प्रकल्पाचे प्रवर्तक यांना नविन प्रकल्पासाठी शूभेछया दिल्या व अंभोरा गावामध्ये एवढा मोठा प्रकल्प उभारताय यासाठीही त्यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांचे आभार व्यक्त केले. तसेच सद्यस्थितीत सूरू असलेल्या कारखान्यामध्ये एकूण ८० मनूष्यबळ आहे व नविन प्रकल्पामध्ये एकूण | यावर श्री. अजिंक्य नाकोड, प्रकल्प सल्लागार, यांनी सांगितले की, सद्यस्थितीत सूरू असलेल्या कारखान्यामध्ये ५२ सीएमडी पाण्याचा उपयोग होतो. प्रस्तावित उत्पादन हे Zero Liquid Discharge (ZLD) वर आधारीत आहे म्हणजे निर्माण होणारे सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात जाणार नाही. तसेच सांडपाण्याची वाफ तयार करून उरलेला जो घनकचरा आहे तो सामोहिक घातक घनकचरा प्रक्रिया |

| | | |
|---|---|---|
| | २१० मनूष्यबळ लागणार आहे म्हणजेच रोजगार निर्मिती होणार आहे यासाठीही आभार व्यक्त केले. पूढे त्यांनी सांगितले की, आजूबाजूचे शेतातील पाणी दूषित झालेले आहे परंतू या कंपनीमूळे पाणी दूषित झाले किंवा नाही याबबत स्पष्टता नाही. तसेच कंपनीचा इटीपी प्लांट मागील दोन वर्षापासून बंद असल्यामूळे पाणी प्रदूषीत झाले आहे असे सांगितले. पूढे त्यांनी प्रकल्प धारकांना विनंती केली की, सदर कंपनीचा इटीपी प्लांट चालू ठेवावा व त्यातील प्रक्रियाकृत पाणी कंपनीमधील झाडांसाठी त्याचा वापर करावा जेणे करून आजूबाजूच्या परीसरातील पाणी खराब होणार नाही व गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे गंभीर प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच नविन प्रकल्पाला आमचा कसलाही विरोध नाही असेही त्यांनी सांगितले. | केंद्रास पाठविला जातो. |
| २. | ॲड. सत्यजीत क-हाळे, रा. अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड यांनी विचारले की, सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे इटीपी प्लांट ची क्षमता ही १२५ सीएमडी आहे तो नेमका नविन प्लांट साठी आहे की सद्य:स्थितीत असलेल्या प्लांटचा आहे. पूढे त्यांनी विचारले की, सादरकरणामध्ये इटीपी प्लांट कशा प्रकारे सूरू ठेवणार आहे, मॉनीटर कसे असणार, याबाबत सांगितले नाही. अंभोरा गावाच्या वतीने त्यांनी विनंती केली की, येथील पाण्याची व मातीची दर दोन ते तीन महिण्याला खाजगी संस्था व शासकीय कार्यालयाकडून तपासणी करावी व त्याचा अहवाल आपण ग्रामपंचायत कार्यालयाकडे सादर करावा. जेणेकरून अहवालाबाबत सविस्तर चर्चा करून प्रदूषणाबाबची माहिती ही नागरिकांना कळेल. तसेच ईआयए ड्राफट हा सन २०२२ पर्यंतच अभ्यास करून बनविलेला आहे. तसेच रोजगाराबाबत येथे गावातील लोकानांच प्राधाण्य राहील अशी ग्वाही दिलेली नाही. | यावर श्री. अजिंक्य नाकोड, प्रकल्प सल्लागार, यांनी सांगितले की की, १२५ सीएमडी क्षमता असलेला इटीपी प्लांट हा नविन प्रकल्पासाठी प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत सूरू असलेले उत्पादन हे पाण्यात विरघळणारे आहे. त्यामूळे यामध्ये पाण्याचा खूप कमी प्रमाणात उपयोग होतो तसेच थोडे फार सांडपाणी निर्माण होते त्यासाठी इटीपी प्लांट बसविलेला असून तो कार्यरत आहे व प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी उद्योगाच्या परिसरात झाडांसाठी वापरण्यात येते. तसेच जलसाठयाच्या प्रश्नावर त्यांनी सांगितले की, मप्रनि मंडळाच्या मानकानूसार १० कि.मी. च्या अंतरावर प्रस्तावित जलाशयाचे नमूने घेण्यात आलेले आहे.<br><br>यावर श्री. सो. म. कुरमुडे, यांनी सांगितले की, सद्य:स्थितीत सूरू असलेल्या प्रकल्पास इटीपी प्लांट बसविलेला आहे.<br><br>पूढे यावर प्रकल्पाचे प्रतिनिधी श्री. सुभाष मुथा |

| | | |
|---|---|---|
| | जलसाठयासंदर्भात त्यांनी सांगितले की, जवळच असलेला वाघळूज तळयाचा यात उल्लेख केलेला नाही आणि अंभोरा गावाला याच तळयामधून पिण्याच्या पाण्याचा पूरवठा आहे. तसेच पिण्याचे पाण्याच्या ब-याच समस्या गावामध्ये आहे. अंभोरा गाव व आजूबाजच्या गावातील लोकांनाच समसमान रोजगारामध्ये प्राधाण्य देण्यात यावे अशी रोजगाराची श्वासती प्रकल्प धारकाने दयावी. तसेच सीएसआर निधी हा आजूबाजूच्या गावातील ग्रांपचायत कार्यालयांना सविस्तर चर्चा करून तो निधी गावाच्या विकासासाठी कसा वापरता येईल यासाठी आपण एक समिती स्थापण करावी जेणेकरून गावाचा विकास होण्यास मदत होईल. तसेच उद्योगामधून निघणा-या घनकच-याची विल्हेवाट अधिकृत संस्थेमार्फत विल्हेवाट करण्यात यावी व त्याबाबतचे कायदेशिर बाबी तपासण्यात याव्यात अशी विनंती केली. | (संचालक) यांनी सांगितले की, ज्यावेळेस श्री. नानासाहेब आमले यांची पाणी दूषित होत आहे बाबत तक्रार आल्यानंतर मप्रनि मंडळाने पाण्याचे नमूने तपासणी केलेली आहे तसेच त्याचा पृथकरण अहवाल हा सदर ग्रामपंचायतील व तक्रारदाराला दिलेला आहे. तसेच सदर कारखाना सूरू करण्याआधी सर्वप्रथम आम्ही इटीपी प्लांट बसविलेला आहे आणि आपण मांडलेल्या सूचनांचा आम्ही नक्की त्यात सूधारणा करू असेही सांगितले. |
| ३. | श्री. नानासाहेब तूकाराम आमले, रा. अंभारो, ता. आष्टी, जि. बीड यांनी सांगितले की, माझ्या शेतातील नूकसान या प्रकल्पामूळे झालेले आहे. पाणी खराब झाले आहे. तसेच विहीरीसूध्दा खराब झाल्या आहे माझी संत्रयाची बागीचे नूकसान देखील झालेले आहे. | यावर श्री. शिवकूमार स्वामी, अव्वर जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी सांगितले की, आपल्या तक्रारीनूसार पाण्याचे नमूने तपासणी साठी घेण्यात आलेले होते.<br><br>पूढे यावर श्री. सो. म. कुरमुडे, यांनी सांगितले की, आपण मप्रनि मंडळाकडे एक अर्ज करावा त्यानूसार पून्हा एकदा सदर पाण्याचे नमूने तपासणीसाठी घेण्यात येतील व आपणास याबाबतचा पृथकरण अहवाल कळविण्यात येईल. |
| ४. | श्री. सूनंदा रेडडी, पर्यावरणवादी, तेलंगना, यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. तसेच उद्योगाचे प्रतिनीधी यांनी पर्यावरणाची काळजी घ्यावी अशी विनंती केली. | यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची लिखीत नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ५. | श्री. संतोष गुंड, रा. वाघळूज, ता. आष्टी, जि. बीड यांनी सांगितले की, प्रकल्पाला लागूनच माझी शेती आहे. माझ्या शेतातील विहीरीला व | यावर श्री. शिवकूमार स्वामी, अव्वर जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी सांगितले की, आपण केलेल्या सूचनांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शेततळयातील पाणी दूषित झाले आहे परंतू या कंपनीच्या पाण्यामूळे व बॉयलरच्या धूरामूळे झाले असावे किंवा नाही याबाबत माझा गैरसमज आहे. यामूळे मला माझ्या शेतातील पाण्याचे नमूने तपासणीसाठी दयावयाचे आहेत जेणेकरून त्याच्या अहवालानूसार कळेल की पाणी का प्रदूषित होत आहे याबाबत मार्गदर्शन करावे अशी विनंती प्रशासनास केली. | |
| ६. | श्री. राजेश रामभाउ अटोळे, रा. अंभोरा, ता. आष्टी, जि. बीड यांनी सांगितले की, जवळपास ५०० मी. च्या अंतरावर या कंपनीच्या धूराचा/केकिकल्सचा वास येवून गावातील नागरीकांना याचा त्रास सहन करावा लागतोय. तसेच पिण्याच्या पाण्याचा गंभीर असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच पूढे बोलताना त्यांनी सांगितले की, सदर प्रकल्पाला कूठलाही विरोध नाही कारण गावातील नागरीकांना येथे रोजगार दिलेला आहे आणि गावाची आर्थीक मदत देखील या प्रकल्पामूळे होत असते. परंतू प्रकल्प प्रवर्तकांनी योग्य त्या उपाययोजना कराव्यात जेणेकरून भविष्यात अंभोरा ग्रापंचायत तसेच येथील नागरीकांना या प्रकल्पामूळे नैसर्गिक आपत्ती व हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. | यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

श्री. शिवकूमार स्वामी अव्वर जिल्हादंडाधिकारी बीड तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी उपस्थितांना संबोधित केले की, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांची नोंद घेण्यात आलेली असून. तथापि मी स्वत: जिल्हा आपत्ती व्यवस्थापण प्रमुख असल्यामूळे प्रकल्प सल्लागार यांना सूचित केले की, सादरीकरणामध्ये आपण आपत्ती व्यवस्थापण योजना २००५ कायदयाप्रमाणे आपत्ती व्यवस्थापणाबाबत उल्लेख केलेला नाही, ही गंभीर बाब आहे. ज्यामध्ये आजूबाजूच्या शेती, प्रकल्पात सद्य:स्थितीत काम करणारे व भविष्यात येणारे कामगार यांना भविष्यात एखादा अपघात झाल्यास त्यासाठी कूठल्याही प्रकारचा आपत्ती व्यवस्थापनबाबत योजना दिसून येत नाही.

श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांना सूचित केले की, अव्वर जिल्हादंडाधिकारी साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे

सुधारणा करण्यात यावी, तसेच सीएसआर निधी हा संबंधित ग्रामपंचायती सोबत चर्चा करून तसेच नियमाप्रमाणे कार्यवाही करून पर्यावरणाशी निगडीत असलेल्या बाबींवर खर्च करावा. पूढे श्री. सो. म. कुरमुडे, यांनी सदर जाहीर लोक सुनावणी समिती चे अध्यक्ष व सदस्य तसेच उपस्थित नागरिकांचे आभार व्यक्त केले.

शेवटी श्री. शिवकूमार स्वामी, अव्वर जिल्हादंडाधिकारी बीड तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सो. म. कुरमुडे** | **सुजित ढोलम** | **शिवकुमार स्वामी** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | अव्वर जिल्हादंडाधिकारी बीड. |
| म.प्र.नि. मंडळ, जालना. | म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | |